(SJIF) Impact Factor-7.675 ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

## August -2021

ISSUE No- (CCCX) 310

## WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES







**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr. Nilima D. Deshmukh
Principal
Sahakar Maharshi
Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

**Editor**
Dr. Archana S. Dahane
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer- peer-Reviewed& Refereed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## August -2021

ISSUE No- (CCCX) 310

## WOMEN'S EMPOWERMENT : ISSUES & CHALLENGES

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr. Nilima D. Deshmukh**
Editor
**Principal**
Sahakar Maharshi Late Bhaskarrao Shingne
Arts College, Khamgaon, Dist. Buldana

**Dr. Archana S. Dahane**
Editor
Officiating Principal
Yeshwant Mahavidyalaya, Seloo

**Aadhar International Publication**
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 310 (CCCX )
ISSN : 2278-9308
August, 2021

## INDEX-310


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Empowerment of Women: Issues & Challenges | Dr. Seema P. Salgaonkar | 1 |
| 2 | साहित्य आणि महिला सक्षमीकरण | प्रा. नरहरी सयाजी राऊत | 7 |
| 3 | मानवी हक्क आणि महिला सक्षमीकरण | जयेश रामदास ब्राम्हणे | 11 |
| 4 | महिलांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय सक्षमीकरण आणि भारत | प्रा. मुनेश्वर ता. जमईवार | 16 |
| 5 | भारतातील स्त्रियांच्या स्थिती आणि कायदे | आदेश कुमार राऊत | 19 |
| 6 | भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत डॉ. सुशीला नायर यांचे योगदान | डॉ. पुरूषोत्तम सं.माहोरे | 24 |
| 7 | आजच्या काळातील नौकरी करणा–या महीलां समोरील मुलांचा आहार व आरोग्य एक आव्हान. | प्रा.कविता आर.किर्दक | 29 |
| 8 | राजकीय क्षेत्र आणि महिला सबलीकरण : संधी आणि आव्हाने | प्रा. डॉ. साधना देशमुख | 31 |
| 9 | महिला सक्षमीकरण आणि कायदा | प्रा.शहाणे रंजना प्रल्हादराव | 33 |
| 10 | महिला सक्षमीकरणात स्त्रीवादी साहित्याची भूमिका एक अभ्यास | प्रा. अलका कोकाटे (काळणे) | 37 |
| 11 | भारतातील स्त्रीमुक्ती चळवळ आणि वृत्तपत्रांची भूमिका | प्रा.डॉ.एल.यु मेश्राम /प्रा.श्रीमती स्मिता भामरे | 41 |
| 12 | स्थानिक स्वराज्य संस्थेतील महिला नेतृत्व | प्रा.रुपाली वंसतराव देशमुख | 44 |
| 13 | महिला सबलीकरण आणि भारतीय संविधान एक समाजशास्त्रीय अध्ययन | डॉ. सुजाता रामदासजी नाईक | 47 |
| 14 | स्त्रीयांवरील सामाजिक निर्बंध आणि परविर्तन | प्रा.डॉ.दयानंद उत्तमराव राऊत | 52 |
| 15 | सविनय कायदेभंग चळवळीत महिलांचे योगदान | प्रा. लुलेश्वर धरमसारे | 56 |
| 16 | राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या काव्यातील स्त्रीविचार | स्वप्नील राजेश इंगोले | 59 |
| 17 | महिला सक्षमीकरण व महिलांचा राजकिय सहभाग | प्रा. गोपालकृष्ण श्री. राखोंडे | 64 |
| 18 | महिला सबलीकरण आणि स्त्री पुरुष समानता | सहा प्राध्या. पवन महंत | 68 |
| 19 | महिला पुढील आव्हाने आणि महिला सशक्तीकरणाची आवश्यकता | डॉ. अमित आर पांडे | 74 |
| 20 | महिला सबलीकरण आजची गरज | डॉ. विठ्ठल ल. मंदुलवार | 78 |
| 21 | महिला सबलीकरणात एनजीओची भूमिका आणि महिला सक्षमीकरण | आरती एम. देशमुख | 83 |

| | | |
|---|---|---|
| 22 | ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती आणि महिला सबलीकरण<br>**प्रा.डॉ. दिनकर संतुकराव कळंबे /पंढरीनाथ रामाजी गाढे** | 89 |
| 23 | शारीरिक शिक्षण व महिलांचे सशक्तिकरण<br>प्रा. गणेश श्री. विश्वकर्मा | 92 |
| 24 | विजया वाड यांच्या 'ऋणानुबंध' कथासंग्रहातील स्त्रीवादी कथा<br>प्रा. डॉ. सौ. मंगल एकनाथ डोंगरे | 95 |
| 25 | राजकीय सहभागातून महिला सबलीकरण **प्रा. डॉ. लक्ष्मण फुलचंद शिराळे** | 102 |
| 26 | महिला सबलीकरण : आर्थिक, सामाजिक, राजकीय दृष्टीने मुल्यमापन<br>**प्रा. डॉ. पी. डी. हुडेकर** | 105 |
| 27 | मानवाधिकार व कायद्यांच्या माध्यमातून स्त्री सबलीकरण आणि आजची स्थिती प्रा.डॉ.नंदकिशोर अरूळकर | 109 |
| 28 | राष्ट्रविकासात महिला सक्षमीकरणाची भूमिका डॉ.राजेश्री अप्पाराव जाधव | 113 |
| 29 | मानवाधिकार आणि महिला सक्षमीकरण डॉ. विनोद मारोतराव मुडे | 118 |
| 30 | महिला सक्षमीकरण व मानवाधिकार –एक दृष्टी डॉ.एन.डी.बालपांडे | 124 |
| 31 | **महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय**<br>प्रा. डॉ. भुरके नागोराव संभाजी | 129 |
| 32 | स्त्रीयांवरील अत्याचार एक समस्या डॉ. सुनिलदत्त एस. गवरे | 133 |
| 33 | ग्रामीण आणि शहरी विभागातील किशोरवयीन मुलींच्या पोषणाचा तुलनात्मक अभ्यास. कु. मालती पांडुरंग सातव | 138 |
| 34 | भारतातील स्त्रियांचाबदलता दर्जा: एक अध्ययन **डॉ.गजानन संतोषराव कुबडे** | 142 |
| 35 | भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण **प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे** | 145 |
| 36 | मानवी हक्क आणि महिला सबलीकरण डॉ सौ. वंदना विनायक नढे | 149 |
| 37 | भारतीयस्वातंत्र्य चळवळीतीलविदेशी स्त्रियांचे योगदान प्रा.श्री. अमोल अरूण कुंभार | 153 |
| 38 | स्त्रियांचे पोषण आणि आरोग्य समस्या **Rupali Amit Tapre(Bargal)** | 158 |
| 39 | मानव अधिकार आणि महिला सबलीकरण<br>प्रा. डॉ वैशाली शांताराम बागुल | 164 |
| 40 | वृध्द स्त्रियांच्या पोषणविषयक समस्या एक अध्ययन<br>प्रा.वनिता किसनराव बोदडे | 170 |
| 41 | The Empowerment of Indian Women by Dr. B.R. Ambedkar<br>**Dr. Sanjay G. Kulkarni** | 174 |

# भारतीय संविधान आणि महिला सक्षमिकरण

**प्रा.डॉ.भिमराव प्रल्हाद उबाळे**
समाजशास्त्र विभाग संत भगवान बाबा कला महाविद्यालय सिंदखेड राजा जि.बुलडाणा
मो.नं.9921832994 ,ई-मेल: ubale971@gmail.com

प्राचिन मनु व्यवस्थेने स्त्रीला बंदिस्त केले होते. त्या व्यवस्थेला ठोकरण्याचे काम म.फुले यांनी स्त्रीशिक्षणाव्दारे व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी कायद्याव्दारे स्त्रीयांना कुटूंबात व समाजात स्थिरता व प्रतिष्ठा मिळवून देण्याचे काम केले. स्त्रीयांच्या सक्षमिकरणास सर्वात मोठा अडथळा भारतात जर कोणता असेल तर तो पुरूषी वर्चस्व व प्ररुष प्रधान संस्कृती, हजारो वर्षापासून टिकून राहीली हा आहे. पारंपारिक पुरूषप्रधान समाजाने गेल्या 150 वर्षापर्यंत स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवले. शिक्षणाचा हक्क धार्मिक व्यवस्थेने नाकरल्याने समाजात व देशात अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत.

19 व्या शतकात स्त्रीयांना अत्यंत क्रुर व दुय्यम अशी जनावरापेक्षा ही वाईट वागणुक मिळत होती. स्त्रीला माणुस माणण्यासच व्यवस्था नाकारत होती. ती फक्त उपभोगाची वस्तु आहे. रांधा, वाढा, पतीसेवा हेच तिचे काम. समाजात वाढलेल्या अनैतिकतेमुळे विधवांचा प्रश्न फार गंभीर बनला होता. विधवांचे केशवपन करुन त्यांना विद्रुप केले जात होते. विधवांना पुर्नविवाहाची बंदी होती. अशा या स्त्रीयांच्या असहाय्यतेचा धर्ममार्तंड शारिरीक उपभोग घेत असत आणि त्यानंतर गर्भधारणा झाली तर समाज त्यांना जगु देत नसे. त्याकाळी समाजात बालविवाह, कुमारी जरठ विवाह, पुर्नविवाहास विरोध, सतीप्रथा, देवदासी, मुरळी, शिक्षण बंदी अशा अनेक प्रथाव्दारे स्त्री समाजावर अन्याय अत्याचार केले जात. स्त्रीयांवर अनेक बंधने लादली होती व अनेक ग्रंथामधून त्या प्रथा व परंपरांचा प्रसार व प्रचार केला जात होता.

➢ **डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा महिला सक्षमिकरणा बाबत चा दृष्टीकोण**

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी या समाज व्यवस्थेचा सखोल अभ्यास केला. त्यांची ठाम अशी खात्री झाली की, या देशाची प्रगती, विकास जर करावयाचा असेल तर सर्वप्रथम या देशातील महिलांचा विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. जो पर्यंत महिलांचा विकास होणार नाही, तो पर्यंत देश विकसित होणार नाही. म्हणूनच त्यांनी महिलांच्या व देशाच्या उज्वल भविष्यासाठी अहोरात्र कष्ट करुन "हिंदू कोड बिल" लिहिले. या बिलाच्या माध्यमातून त्यांना या देशातील महिलांना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात समानता मिळवून द्यावयाची होती.

स्वातंत्र्य प्रप्ती नंतर संविधानात महिलांच्या मानवी हक्कास लागु करण्यासाठी घटनात्मक उपाय योजना करण्यात आल्या. संविधानाच्या उद्देश पत्रिकेचा प्रारंभच लोकशाही विचाराला प्राधान्य देणारा आहे. आम्ही भारतीय लोक हा शब्द प्रयोग स्त्री आणि पुरूष समानतेला अभिव्यक्त करतो. या वरुन भविष्यातील या देशाची वाटचाल स्त्रीयांच्या मानवी व मुलभूत हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी संविधानाची (सरकारची) असेल हे स्पष्ट होते. महिलांच्या मानवी हक्काची तरतुद संविधानातील तिसऱ्या भागात म्हणजे मुलभूत अधिकारात करण्यात आली. मुलभूत अधिकार देतांना संविधान स्त्री-पुरूष असा भेदभाव करत नाही. कलम 12 ते 35 पर्यंत सर्वच अधिकार बंधना सहित या देशातील सर्व स्त्री-पुरूषांना समान स्वरुपात देण्यात आले आहेत. राज्यशासन कोणत्याही नागरीकामध्ये कोणत्याही प्रकारचा भेदभाव करणार नाही. धर्म, जात, वंश आणि लिंगाच्या आधारावर कोणीही नागरीक अयोग्य व इत्तर सार्वजनिक सुविधांसाठी अपात्र ठरविल्या जाणार नाही. राज्यांना स्त्रीया आणि बालकांसाठी कोणतीही तरतुद

करण्यासाठी रोखले जाणार नाही. राज्यातील कोणत्याही पदासंदर्भात जात, धर्म, वंश आणि लिंगाच्या आधारावर कोणताही व्यक्ती अपात्र ठरविला जाणार नाही. अशी स्पष्ट तरतुद केलेली आहे.

➢ **संविधानात महिला सक्षमिकरणासाठी केलेल्या काही तरतुदी :-**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या देशातील जाती व्यवस्थेवर आधारीत हिंदू धर्मातील विषमतेचा, उच्च निचतेचा उध्वंस करुन सामाजिक समता निर्माण करण्याचा मानस ठेवून भारतीय राज्य घटना निर्माण केली. संविधानातील अनेक कलमा मधून त्यांनी स्त्री सक्षमिकरणासाठी केलेला अभ्यास व मेहनतीमधून त्यांची सकल स्त्री जाती विषयी असलेले प्रेम व ओढ दिसून येते.

1) संविधानातील कलम 14 नुसार सर्व नागरीक कायद्यापुढे समान आहे.

2) संविधानातील कलम 15 नुसार धर्म, वंश, जात, लिंग व जन्मस्थान यावरुन कोणत्याही प्रकारचा भेदभाव केला जाणार नाही.

3) कलम 16 नुसार शासकीय सेवेत सर्वांना समान संधी असेल.

4) संविधानातील समानतेच्या, समतेच्या अधिकारामुळे स्त्रीयांना स्वातंत्र्य मिळाले.

5) सामाजिक समात व सामाजिक न्यायाचा पुरस्कार संविधानात केल्यामुळे स्त्रीया सह अनेक वंचित घटकांना न्याय मिळाला.

6) डॉ.बाबासाहेब आंबेकडर यांनी हिंदू स्त्रीयांचा कौटुंबीक दर्जा उंचावण्यासाठी चार कायदे पारीत केले.

i. हिंदू विवाह कायदा - 1955
ii. हिंदू वारसा कायदा - 1956
iii. हिंदू अज्ञान व पालकत्वाचा कायदा - 1956
iv. हिंदू दत्तक आणि पोटगी कायदो - 1956

या चार कायद्यांनी परंपरागत रुढी व धर्माच्या अन्यायी बेड्यांनी जखडलेली हिंदू स्त्री मुक्त झाली.

7) कलम 21 नुसार कुणाचेही जीवन किंवा व्यक्ती स्वातंत्र्य कायद्याच्या योग्य प्रक्रिये शिवाय हिरावले जावू नये असा मसुदा मांडण्यात आला.

8) कलम 38 नुसार कायद्याचा वापर सामाजिक न्यायावर आधारलेली नवी समाज व्यवस्था स्थापण करण्यासाठी करण्यात आला.

9) कलम 41 नुसार सर्व 14 वर्षाखालील मुला-मुलींना सक्तीचे आणि मोफत शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली.

10)सर्व जाती धर्मातील स्त्रीयांना हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून समान अधिकार मिळाला.

➢ **स्त्री सक्षमिकरणासाठी करण्यात आलेले कायदे**

**1) हुंडा प्रतिबंध कायदा 1961 :-**

1961 च्या कायद्याने हुंडा मागणे आणि हुंडा देणे गुन्हे आहेत. हा कायदा अधिक प्रभावी होण्यासाठी भारतीय दंड संहितेमध्ये 304 (ख) आणि 498 (क) ही नविन कलमे अंतर्भूत केली आहेत.

**2) महिला संरक्षण कायदा :-**

कौटुंबिक छळ प्रतिबंधक कायदा स्त्रीला कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक व शारीरीक संरक्षण देतो. हा कायदा फक्त पुरषा विरुध्दच लागू होतो.

**3) अश्लिलते विरुध्द कायदा :-**

भारतीय दंड संहितेच्या कलम 292 ते 294 मध्ये महिलांशी अश्लिील वर्तन करणाऱ्यांना शिक्षा देण्याची दरतुद आहे.

**4) बालविवाह प्रतिबंधक कायदा :-**

बाल विवाहाची प्रथा बंद करण्यासाठी बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम (शारदा ॲक्ट) 1987 मध्ये सुधारणा झ ााली.

**5) कौटुंबिक न्यायालय कायदा :-**

दांपत्य व कौटुंबिक कलहाची प्रकरणे एकाच ठिकाणी सोडविण्यासाठी कौटुंबिक अधिनियम 1984 मध्ये लागू करण्यात आला आहे.

**6) छेडछाड करणे गुन्हा :-**

स्त्रीयांची अब्रु लुटणे, त्यांचा हात धरणे, त्यांच्या वस्त्रांना हात लावणे अशा प्रकारे स्त्रीयांचा विनयभंग करणाऱ्यांना भारतीय दंड संहिता 354 खाली शिक्षेची तरतुद आहे. तसेच कलम 509 अंतर्गत पोलिसात तक्रार करता येते.

**7) मुलांवर हक्क (कायदा) :-**

एखाद्या स्त्रीचा घटस्फोट झाल्यास तिच्या पाच वर्षापर्यंतच्या मुलांना ती स्वतः जवळ ठेवू शकते. मात्र पाच वर्षापेक्षा जास्त वयाच्या मुलांच्या बाबतीत कोर्टाचा निर्णय अंतिम असतो.

**8) समान वेतन कायदा :-**

समान वेतन कायद्यानुसार एकाच कामासाठी स्त्री आणि पुरूषांना समान वेतन मिळाले पाहिजे. विशिष्ट क्षेत्रातील नोकरी सोडता अन्य ठिकाणी स्त्रीयांना रात्रपाळीला कामाला बोलावता येत नाही.

**9) लैंगिक गुन्हे :-**

लैंगिक गुन्ह्यांच्या संदर्भात भारतीय दंड संहिता कलम 375 व 373 नुसार कडक शिक्षा देण्यात येतात. लैंगिक प्रकरणाची सुनावणी बंद खोलित होते.

**10) हिंदू उत्तराधिकार कायदा 1956 :-**

1956 मध्ये निर्माण झालेल्या हिंदू उत्तराधिकारी कायद्यानुसार महिलांना संपत्तीमध्ये व्यापक अधिकार देण्यात आला असून स्त्रीधनाचा उपभोग घेण्याचा व ते धन खर्च करण्यावा अनिर्बंध अधिकार स्त्रीयांना मिळाला आहे.

**11) हिंदू विवाह कायदा 1955 :-**

भारतीय दंड संहिता 125 नुसार स्त्रीला पोटगीची मागणी करण्याचा हक्क आहे. हिंदू विवाह कायदा 1955 कलम 25 नुसार अर्ज दाखल केल्यानंतर कोर्ट पोटगीची रक्कम देण्याचा प्रतिवादीस आदेश देते.

**12) प्रसुती सुविधा कायदा :-**

नोकरी पेशातील स्त्रीयांसाठी बाळंतपणाची आणि नवजात बाळाची काळजी व देखरेख करण्यासाठी रजेची तरतुद असून त्या काळात महिलांना विशिष्ट दिवसाची भर पगारी रजा मिळते.

**13) विशेष विवाह अधिनियम 1954 :-**

विशेष विवाह अधिनियम 1954 च्या तरतुदी नुसार मानसिक दृष्ट्या सक्षम आणि 18 वर्ष पूर्ण झालेली स्त्री प्रेम विवाह किंवा आंतरजातीय विवाह स्वतःच्या इच्छेनुसार करु शकते.

**14) गर्भलिंग चाचणी कायदा 1994 :-**

स्त्री भ्रुण हत्या रोखणे व गर्भ लिंग जाणून घेण्याच्या तंत्राचा उपयोग करणे यावर अंकुश ठेवण्यासाठी प्रसुती निदान आणि तंत्रज्ञान अधिनियम व दुरूपयोग निवारण अधिनियम 1994 आहे.

15) महिलांचे शोषण व छळ होवू नये म्हणून हायकोर्टाच्या आदेशानुसार प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा महिला सहाय्यता समिती स्थापण झाली आहे.

**16) लैंगिक छळाविरुध्द मार्गदर्शन :-**

नोकरीच्या ठिकाणी महिलांचा होणारा लैंगिक छळ थांबविण्यासाठी सुप्रीम कोर्टाने मार्गदर्शक तत्वे लागू केली आहेत. खासगी, सार्वजनिक तसेच अन्य संस्थामध्ये सुध्दा तो लागू आहे.

**17) महिलांच्या अटके संबंधिचा कायदा :-**

महिलांना फक्त महिला पोलिस सुर्योदयानंतर आणि सुर्यास्तापूर्वी अटक करु शकतात. कुटुंब सदस्यांच्या उपस्थितीत व योग्य कारण असेल तरच स्त्रीला पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावता येते. स्त्रीला अटक केल्यास तिला फक्त महिला कक्षामध्येच ठेवण्यात येते.

**18) महिला आयोग :-**

महिलांना संवैधानिक व न्यायिक सुरक्षा आणि अधिकार देण्यासाठी 31 जानेवारी 1992 ला महिला आयोगाची स्थापणा झाली. महिला कोणतीही तक्रार महिला आयोगाकडे करु शकतात. प्रत्येक राज्यात महिला आयोग स्थापन झ ाला आहे.

➢ **भारतीय संविधानामुळे महिलांची आजची स्थिती**

1) भारतीय संविधानातील तरतुदीमुळे महिलांना समानतेचा अधिकार मिळाला.
2) आज जी महिलांची सामाजिक, शैक्षणिक, राजकीय क्षेत्रात प्रगती दिसते ती संविधानामुळेच.
3) धार्मिक अनिष्ट बंधनातून महिलांची मुक्तता झाली.
4) देवदासी, सतीप्रथा, बेठबिगारी या प्रथांना घटनाबाह्य व गुन्हा स्वरुप ठरविले.
5) महिलांच्या सक्षमिकरणाचा विचार करतांना घटनाकारांनी त्यांच्या वैचारीक परिवर्तनाचा आग्रह धरला.
6) महिलांवरील अन्याय, अत्याचार, भेद या विरुध्द लढण्याचे बळ महिलांना मिळाले.
7) स्वातंत्र्य, समता, भगिणीभाव व सामाजिक न्याय महिलांना कळला.
8) महिलांचा आत्मविश्वास व स्वाभिमान जागृत झाला.
9) सन्मानाने जगण्याची प्रेरणा महिलांना मिळाली.
10) शिक्षण व स्वावलंबनाचे महत्व कळाले.
11) स्त्री - पुरूष समानतेची हमी मिळाली.
12) महिलांना माणुस म्हणून समानतेचा दर्जा, हक्क व अधिकाराची शक्ती मिळाली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानात केवळ दलित महिलांच्या उत्थानाचे प्रयत्न केले नाही तर कष्टकरी, शेतमजुर, पिडीत, एकंदरीत सर्व जाती धर्मातील संपूर्ण महिलांच्या कल्याणाचा व उत्कर्षाचा विचार संविधानात केलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ**

1) स्त्री परिवर्तनाची आव्हाने - डॉ.शुभांगी गोटे- गव्हाणे.
2) म.फुले साहित्य आणि चळवळ - संपादक - हरी नरके.
3) डॉ.बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ - संपादक मंडळ.
4) बोल महामानवाचे - डॉ.नरेंद्र जाधव.
5) इंटरनेट.